PDEA

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे – ३८

# भूगोल विभाग

## वार्षिक शैक्षणिक अहवाल २०२४ – २५

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, मामासाहेब मोहोळ महाविद्यालयातील भूगोल विभागामध्ये तृतीय वर्ष कला – ३५ विद्यार्थी, द्वितीय वर्ष कला – ६२ विद्यार्थी, प्रथम वर्ष – १२० विद्यार्थी इत्यादी एकूण विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

भूगोल विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन, भौगोलिक क्षेत्र भेट अभ्यास, गट चर्चा इत्यादींचे आयोजन करण्यात आले.

### १. २० जुलै २०२४ – 'पर्यावरण संवर्धन' विषयावरील जनजागृतीपर रॅली उपक्रम

शनिवार, दिनांक २० जुलै २०२४ महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे शनिवारवाडा ते मामलेदार कचेरी, छत्रपती शिवाजी रोड या परिसरात 'पर्यावरण संवर्धन' या विषयावरील जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्लास्टिकचा वापर टाळा, पाण्याचा अतिवापर कमी करा, प्रदूषण कमी करा, कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करा, वृक्षलागवड करा, मृदा प्रदूषण करू नका, पृथ्वी वाचवा वसुंधरा वाचवा अश्या अनेक प्रकारच्या पाट्या हातात घेऊन घोषणा देत या रॅलीमध्ये पर्यावरण संवर्धनाचे आव्हान करण्यात आले. महाविद्यालाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. सीमा कांबळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील एकूण १६० विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उस्फुर्तपणे सहभाग घेतला.

### 2. २२ जुलै २०२४ – 'रांगोळी स्पर्धा' थीम – SAVE EARTH SAVE LIFE

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे सोमवार, दिनांक २२ जुलै २०२४ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी **"Save Earth Save Life"** या विषयावरील रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणातील विविध समस्या व त्यावरील उपाय अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने सुंदर अश्या रांगोळ्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी रेखाटल्या. महाविद्यालयातील एकूण ३२ विध्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये उस्फुर्तपणे सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रचिती पंडित व मयुरी पांचाळ (तृतीय वर्ष संगणक शास्त्र) – प्रथम क्रमांक, दिव्या घारे व सानिका चव्हाण (प्रथम वर्ष संगणक शास्त्र) – द्वितीय क्रमांक, आणि नीलम मशाळे (द्वितीय वर्ष-वाणिज्य विभाग) – तृतीय क्रमांक, या विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवले. याप्रसंगी महाविद्यालाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी , तसेच महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते

Scanned with OKEN Scanner

3. २३ सप्टेंबर २०२४ – आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन दिवस साजरा करण्यात आला. दरवर्षी १६ सप्टेंबर हा दिवस ओझोन दिवस म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमांतर्गत श्री. कमलेश कुरणकर यांचे 'ओझोन थराचे महत्व आणि पर्यावरणीय शाश्वतता' या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यानामधून त्यांनी विद्यार्थ्यांना ओझोन थराच्या होणाऱ्या ऱ्हासाबद्दल व त्यासाठी उपयुक्त उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विविध विभागांतील एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन भूगोल विभाग प्रमुख प्रा. सीमा कांबळे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भूगोल विभाग प्रमुख प्रा. सीमा कांबळे यांनी केले तर आभार संगणक विभाग प्रमुख प्रा. संतोष मोरे यांनी व्यक्त केले.

4. २६ डिसेंबर २०२४ – गटचर्चा सत्र वर्ग - प्रथम वर्ष कला

महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला वर्गातील विद्यार्थ्यांसाठी गुरुवार, दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, नवीन अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची मते व त्यांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांवर आधारित गटचर्चा सत्र" आयोजित करण्यात आले. यामध्ये भूगोल विभाग प्रमुख प्रा. सीमा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उपरोक्त विषयांवर आपली मते मांडली व नवीन अभ्यासक्रम संदर्भात चर्चेमध्ये सक्रीय सहभाग घेतला. या उपक्रमात एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

5. १४ जानेवारी २०२५ – भूगोल दिवस कार्यक्रम

महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे सोमवार, दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी भूगोल दिवस साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यालयीन अधीक्षक श्री विनोद रणपिसे यांचे जागतिक पर्यावरण आणि जैवविविधता संवर्धन या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी भूगोल दिवसाचे महत्व आणि सध्याचे बदलते हवामान यावर आपली मते मांडली. या उपक्रमात एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

6. १९ जानेवारी २०२५ – भौगोलिक क्षेत्र भेट अभ्यास (बेलावडे गाव)

रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२४, रोजी बेलावडे या गावी एन. एस. एस. चा कॅम्प गेला असताना भूगोल विभाग प्रमुख प्रा. सीमा कांबळे यांनी या ठिकाणी भेट देऊन कॅम्प मधील मुलांना सोबत घेऊन संपूर्ण गावाचा भौगोलिक अभ्यास केला. व कॅम्प मधील सर्व विद्यार्थ्यांना परिसरातील भौगोलिक घटकांची ओळख करून दिली.

Kambl

विभाग प्रमुख

प्राचार्य

Scanned with OKEN Scanner